
आजचा
दिनविशेष
१९७९ : गुजरातमधील मोरवी येथे धरण फुटले आणि हजारो लोकांचा मृत्यू झाला.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | सोमवार ११ ऑगस्ट २०२५ | अंक २३३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत, चावा घेताच मोठ्या खेळाडूसह दोघांचा मृत्यू, लोकांत भीतीचं वातावरण!

कुत्र्यांचा वाढता उपद्रव ही आजघडीला मोठी समस्या बनली आहे. जागोजागी तुम्हाला कुत्रे दिसतील. विशेष म्हणजे यातील काही कुत्रे हे हिंस्त्र असतात. त्यांना कोणताही त्रास दिलेला नसला तरी ते माणसांवर हल्ले करतात. नागरिकांकडून अनेकदा अशा भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जाते. तरीदेखील या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव काही कमी होताना दिसत नाही. दरम्यांना आता सर्वांनाच हादरवून टाकणारी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. एका पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने दोघांचा तडफडून मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे मृतांमध्ये एक राष्ट्रीय स्तरावरचा पॅरा-अॅथेलिटदेखील होता. या धक्कादायक घटनेनंतर सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. नेमकं काय घडलं?मिळालेल्या माहितीनुसार ही घटना ओडिशा राज्यातील बोलांगीर जिल्ह्यातील चिनचेरा गावातील आहे. येते एका पिसाळलेल्या कुत्र्यामुळे दोन लोकांचा जीव गेला आहे. या घटनेनंतर संपूर्ण गावच सुन्न झाले आहे. मृतांमध्ये 33 वर्षीय योगेंद्र छत्रिया नावाच्या राष्ट्रीय स्तरावरील पॅरा-अॅथेलिटचा समावेश आहे. हृषिकेस राणा असे मृत्यू झालेल्या 48 वर्षीय अन्य व्यक्तीचे नाव आहे. या दोघांचाही शनिवारी रात्री उशिरा बुर्ला



येथील विमसार वैद्यकीय महाविद्याल आणि रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. चार जणांचा जीव बचावला, दोघांचा मृत्यू दरम्यान, कुत्र्याने चावा घेतलेल्या सहा जणांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. चार जणांचा सुदैवाने जीव वाचला.

### कुत्र्याने कशा पद्धतीने चावा घेतला?

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार 23 जुलै रोजी चिनचेरा गावात एक पिसाळलेला कुत्रा घुसला होता. त्या दिवशी त्याने एकूण सहा जणांचा चावा घेतला. समोर जी व्यक्ती दिसेल, त्याला हा कुत्रा चावत सुटला होता. काही लोक त्याच्या हल्ल्यातून बचावले. मात्र एकूण सहा जणांना चावा घेण्यात तो पिसाळलेला कुत्रा यशस्वी ठरला. विशेष म्हणजे शाळेत जाणाऱ्या काही विद्यार्थ्यांवरही या कुत्र्याने हल्ला करून चावा घेण्याचा प्रयत्न केला होता.

परंतु ऋषिकेश आणि योगेंद्र यांची प्रकृती ढासाळतच गेली. त्यांचा जीव वाचवण्याचा डॉक्टरांना अटोकाट प्रयत्न केला. मात्र उपचारांना साथ न दिल्याने या दोघांचाही मृत्यू झाला. योगेंद्र छत्रिया यांनी फ्लोरबॉल स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्त्व केले होते. त्यांच्या अशा अचानक जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे या पिसाळलेल्या कुत्र्याचा शोध घेतला जात असून लवकरच त्याला पकडण्यात येईल, असे प्रशासनाने सांगितले आहे.

## जांब येथील नवसाला पावणाऱ्या कैलासनाथ महादेव मंदिरात उद्या श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवार निमित्त भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा.

. बीड (प्रतिनिधी) जांब तालुका शिरूर कासार जिल्हा बीड येथे पुराणकालीन हेमाडपंती कैलास नाथ महादेवाचे भव्य दिव्य असे शिवमंदिर आहे. हे मंदिर कधीपासून आहे आणखी कोणालाही सांगता येत नाही मंदिराच्या कामात दगड सोडता इतर कुठलीही वस्तू वापरलेली नाही. मंदिराचे विशेष आकर्षण म्हणजे या मंदिरात आपण बोललेला नवस पूर्ण होतो अशी लोकांची श्रद्धा आहे, येथे आलेले लोक आपला आपला अनुभव सांगत असल्यामुळे या ठिकाणी वर्षभर



दर्शनासाठी लोक दूरवरून येत असतात. आणि श्रावण महिन्यात तर खूपच गर्दी असते. श्रावण महिन्यानिमित्त प्रत्येक सोमवारी भक्तांकडून दिवसभर प्रसाद वाटप होतो. गावातील ग्रामस्थांकडून मंदिरात चोख बंदोबस्त केला जातो. अशा या नवसाला पावणाऱ्या महादेव मंदिराचे तिसऱ्या सोमवार निमित्त दर्शन घेण्याचा भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. सुरेश पिंपळे, माझी ACP पी एन खाडे , पुजारी भागिनाथ सानप, प्रल्हाद नागरगोजे, पो.पा. अण्णासाहेब भोसले, सरपंच अभिजीत खाडे, माजी सैनिक वैजनाथ तांबारे, सखाराम सातपुते, बळीराम सातपुते,राजेंद्र नागरगोजे, सुरेश नागरगोजे ,सुनील पवणे यांच्यासह ग्रामस्थांनी केले आहे.

## पाटोदा येथे स्ट्राँग लाइफ न्यूट्रिशन कंपनीचा इव्हेंट उत्साहात संपन्न




पाटोदा प्रतिनिधी दि. 10 ऑगस्ट 2025 रोजी पाटोदा येथे स्ट्राँग लाईफ नुट्रिशन कंपनीचा इव्हेंट उत्साहात पार पडला. या मध्ये गेस्ट स्पीकर म्हणून नवनाथ नागरगोजे सर व अनिताताई तसेच मोहिनी मोहिनी नागरगोजे विशाल अडसूळ चंद्रकांत पवणे, थोरात सर रमेश जायभाये. सर उपस्थित होते.. या कार्यक्रमां मध्ये. पत्रकर नितीन भोंडवे. आनंद जाधव, डांबे. यांचाही सत्कार करण्यात आला. वरील कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून रुकमीणी राउत, वाघमारे साहेब, अनपट साहेब, दळवी साहेब, तांबे साहेब, हिरालाल जायभाय ,सतीश गोरे, माजेद, उपस्थित होते. सदरील कार्यक्रम प्रभू जाधवर आरोग्य सल्लागार. सुनील पवार. विनोद राऊत सर यांच्या नियोजनात पार पडला.

## पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजाचा विचार करावा तरच नगराध्यक्ष मुस्लिम होऊ शकतो:- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड शहराच्या नगराध्यक्ष पदासाठी पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजातील सर्व नेते, कार्यकर्ते, समाजातील विचारवंत यांनी एकत्र येऊन समाजाचा विचार करून एका योग्य उमेदवाराचे समर्थन करावे तरच नगराध्यक्ष पद मुस्लिम समाजाचे होईल.

अन्यथा समाजातील काही गुडघ्याला बाशिंग बांधून तयार



असलेले अनेक भावी नगराध्यक्ष किंवा चमकोगीरी करणारे नेते जर स्वतःची पोळी भाजण्यासाठी जर नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत सर्व उभे राहतील तर '' दोन मांजरीच्या भांडणात माकडाचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही ''खरंच बीडच्या मुस्लिम नेत्यांना समाजाहिताचे काही घेणे देणे असेल तर त्यांनी एकत्र येऊन बैठक घेऊन एकच योग्य उमेदवार उभा करावा हीच अपेक्षा जनतेची आहे.

## सोमवारी बाळनाथ महाराज यांच्या पालखीची मिरवणूक होणार

### पालखी मिरवणुकीचा मान पत्रकार अभिजीत पवार, नवनाथ मोरे, उमेश अनवणे, रामेश्वर अनवणे यांना मिळाला..

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे आणि या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आज या सप्ताहाची सांगता होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताह मधील सर्व कार्यक्रम हे तापोनिधी गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. सप्ताहाची सांगता ही बाळनाथ महाराज यांच्या पालखी मिरवणुकीने



सांगता होणार आहे. या वर्षी पालखी मिरवणुकीचा मान पत्रकार अभिजीत रामेश्वर पवार, नवनाथ पांडुरंग मोरे, उमेश बापुराव अनवणे, रामेश्वर सुग्रीव अनवणे यांना मिळाला आहे. तसेच बाळनाथ महाराज यांची पालखी ही प्रतिवर्षाप्रमाणे बाळनाथ महाराज पादुका मंदिर ( हनुमान मंदिर ) या ठिकाणाहून माऊली दादा मंदिर तथा बाळनाथ महाराज यांच्या समाधी मंदिराला प्रदक्षिणा घालून बंदेवाडी कडे प्रस्थान होईल या नंतर बंदेवाडी या ठिकाणी लालगिरी महाराज यांच्या समाधी जवळ अभिषेक होऊन त्या नंतर बाळनाथ महाराज यांच्या समाधी स्थळी पालखी पोहचेल.पालखी मिरवणुकी नंतर गुरुवर्य तपोनिधी, शांती ब्रह्म ह. भ. प . महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर ( बाळनाथ माऊली संस्थान ) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या होणाऱ्या पालखी मिरवणुकीचा , महाप्रसादाचा, किर्तन श्रावणाचा सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन गुरुवर्य तपोनिधी शांती ब्रह्म महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर आणि समस्थ ग्रामस्थ चाकरवाडी कर यांनी केले आहे.

## शेतकरी, हिंदू-मुस्लिम बांधवांनी मेळाव्यास उपस्थित राहावे-जावेद कुरेशी



बीड । प्रतिनिधी राज्यात कथित गोरक्षकांकडून मुस्लिम खाटीक समाजावर अन्याय व अत्याचार होत असून, याविरोधात शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या हिताच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा हाजी आरफात यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. ११ ऑगस्ट) सायं. ६ वाजता आशीर्वाद लॉन्स, बीड येथे होणार असून, शेतकरी, हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जावेद कुरेशी यांनी केले आहे. कुरेशी समाजावर कथित गोरक्षक रस्त्यात अडवून लुटमारी, मारहाण तसेच जनावरे व रोख रक्कम जबरदस्तीने घेऊन जाण्याच्या घटना घडत आहेत. पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला तरी ती स्वीकारली जात नसल्याचा आरोपही कुरेशी यांनी केला. या अन्यायाच्या निषेधार्थ समाजाने टप्प्याटप्प्याने मोठ्या जनावरांची खरेदी विक्री बंद केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील जनावरांचे बाजार ठप्प झाले असून, त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. जे शेतकरी जनावरे वाढवून मोठी करतात, त्यांनाच विक्री करण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे. यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे कुरेशी यांनी सांगितले.

## नागरी समस्या सोडविण्यासाठी निधी द्या : रुपेशराजे बेद्रे पाटील

बीड प्रतिनिधी :-शहरासह पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि विविध विकास कामांसाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी मराठवाडा रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रुपेशराजे बेद्रेपाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. गुरुवारी (दि.७) अजित पवार बीड दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृहावर त्यांची भेट घेऊन बेद्रेपाटील यांनी सविस्तर निवेदन सादर केले. कोणतेही घटनात्मक पद नसतानाही सामान्य कार्यकर्ता म्हणून बेद्रेपाटील यांनी केलेल्या या सूचनांकडे उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक दृष्टीने पाहत त्वरित प्रशासनाच्या माध्यमातून त्यावर कार्यवाहीचे संकेत दिले. बेद्रे पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहरात स्वच्छता मोहीम, आरोग्यसेवा आणि घंटागाडी सेवा नियमित ठेवण्यासाठी प्रशासनाने सक्रिय



पावले उचलावीत. शहरात स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने महिलांना तसेच शाळेतील विद्यार्थिनींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः बसस्थानक परिसरात, शौचालय सुविधा तसेच सॅनिटरी पॅड उपलब्धता तातडीने करण्यात यावी. तसेच, १० नोव्हेंबर १९९० रोजी स्थापन झालेल्या बीड आकाशवाणी केंद्राने आतापर्यंत उत्तम सेवा दिली असून अंदाजे वीस लाख श्रोते या केंद्राशी जोडलेले आहेत. मात्र, या केंद्रात पूर्णवेळ प्रसारण व कार्यक्रम अधिकारी नाहीत. त्यामुळे केंद्राचे नियमित कार्यक्रम तातडीने सुरू करावेत, अशी विनंती त्यांनी निवेदनात व्यक्त केली आहे. नागरी सुविधा व विकासकामे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या जातील, असा विश्वास व्यक्त केल्याचे रुपेषराजे बेद्रेपाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ११ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## बेस्ट परवड

मुंबई शहरात ओला, उबेर, रिक्षा-टॅक्सीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत चालली असली तरी, आजही ३४ लाख प्रवासी बेस्टच्या बसेसमधून प्रवास करतात. प्रवाशांनी बेस्टकडे पाठ फिरवली, ङ्गबेस्टफ्ची आर्थिक स्थिती मंदावली, बेस्ट तोट्यात जात असल्याची चर्चा गेल्या अनेक महिन्यांपासून ऐकायला येते; परंतु वास्तव हे आहे की, सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला परवडणारी ही सेवा भविष्यात अखंड सुरू राहावी अशी मु ंबईकरांची अपेक्षा आहे. कामगार कर्मचाऱ्यांच्या घामावर मुंबई उभी आहे. श्रीमंतीचा मुकुट मुंबईच्या डोक्यावर असला तरी, कामगारांच्या श्रमावर मुंबईचे वैभव टिकून आहे. मुंबईत आलेला माणूस हा उपाशी राहात नाही, त्याला काम मिळते असा देशभर प्रचार झाल्याने मुंबईत देशाच्या कानाकोपऱ्यांतून लोक रोजगारांसाठी येतात. बेस्टसारख्या परिवहन सेवेत काम करणारा कर्मचारी हा इथला भूमिपुत्र आहे. बेस्टमधल्या नोकरीत राहून त्याने मुंबईकरांची सेवा केली, त्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर आर्थिक ताण सोसावा लागतो ही बातमीसुद्धा मनाला क्लेशदायक वाटते. निवृत्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थकबाकी मिळत नसल्याने बेस्ट उपक्रमाला प्रचंड रोष सहन करावा लागत आहे. बेस्टमधील जवळपास साडेचार हजार निवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांची सप्टेंबर २०२२ पासून उपदानाची तसेच २०१९ पासून अंतिम देणी बाकी आहेत. ही रक्कम जवळपास ५०० ते ६०० कोटींच्या घरात आहे. आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसांपूर्वी आझाद मैदानात कर्मचाऱ्यांना आंदोलन करावे लागले. देणी भागवण्यासाठी वेगळ्या स्वतंत्र निधीची तरतूद करावी, अशी मागणी कर्मचारी युनियनने यावेळी केली. मात्र बेस्टची अवस्था ङ्गआंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंयफ अशी झालेली दिसते. याला गेली तीस वर्षे सत्ता भोगणारी उबाठा सेना जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आमदार मधु चव्हाण यांनी केल्याने, महाविकास आघाडीतील पक्षही उबाठा सेनेला जबाबदार धरतात हे अधोरेखित झाले. बेस्टमध्ये मराठी कर्मचाऱ्यांचा भरणा आहे. कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. सेवानिवृत्ती कर्मचाऱ्यांना त्यांची देणी मिळत नाहीत, आता मराठीचा पुळका आलेल्या उबाठा सेनेला बेस्ट कर्मचाऱ्यांनी प्रश्न विचारायला हवेत. बेस्ट बसच्या जन्माचा प्रवास प्रेरणादायी आहे. घोड्याने ओढणाऱ्या ट्रामपासून, तर डिझेल-इलेक्ट्रिक हायब्रीड एसी बस ते प्रदूषणमुक्त इलेक्ट्रिक बसपर्यंत, विविध प्रकारच्या बसेस व तितक्याच प्रकारच्या वाहतूक सेवा बेस्टने मुंबईकरांना आजवर दिल्या. बेस्टचा जन्म इ. स. १८७३ मध्ये ट्रामवे कंपनीच्या रूपात झाला. ट्राम गाड्यांना वीज पुरवता यावी म्हणून बेस्टने वाडी बंदर येथे नोव्हेंबर १९०५ मध्ये औष्णिक वीज केंद्र स्थापन केले त्यातूनच पुढे बेस्टवर मुंबईला वीज पुरवठा करण्याची जबाबदारी आली. बेस्टची पहिली बस १५ जुलै १९२६ मध्ये अफगाण चर्च ते क्रॉफर्ड मार्केट या मार्गावर धावली. मुंबईकरांनी या सेवेचे जोरदार स्वागत केले. १९४७ मध्ये देश स्वतंत्र होण्याच्या एक आठवडा आधीच बेस्ट मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित आली. बेस्ट ही भारतातल्या सगळ्यात मोठ्या शहरी परिवहन सेवांपैकी एक मानली जाते. मु ंबईच्या कोणत्याही भागात जायला सध्या बेस्टची सेवा उपलब्ध आहे. आर्थिक तोट्यात सापडल्याने बेस्टच्या गाड्यांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. आज बेस्ट उपक्रमाचा तोटा हा साधारण बारा हजार कोटींच्या जवळपास पोहोचला आहे. एकेकाळी ४२ हजार संख्या असलेला कर्मचारी वर्ग २४ हजारांवर आला आहे. त्यामुळे बेस्टमध्ये कोणतीच गोष्ट शाश्वत राहिलेली नाही. त्यात बेस्टला कायमस्वरूपी महाव्यवस्थापक नाहीत. गेल्या दोन ते तीन वर्षांतच तीन ते चार महाव्यवस्थापक होऊन गेले. आजच्या घडीला आशीष शर्माही बेस्टचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. खासदार नारायण राणे यांनी १७ एप्रिल रोजी बेस्ट महाव्यवस्थापकांची भेट घेऊन बेस्टमधील अनेक प्रश्न मार्गी लागावेत, यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे बेस्ट प्रशासनातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा झाल्यानंतर २७ एप्रिल रोजी बेस्ट तिकिट वाढीचा निर्णय झाला. बेस्ट बस भाडेवाडीमुळे बेस्टच्या तिजोरीत अंदाजे वार्षिक ६०० कोटी रुपये जमा होतील, असा अंदाज आहे. यामुळे बेस्टला थोडीफार आर्थिक मदत होईल. या निर्णयामुळे सध्या बेस्टच्या उत्पन्नाचा दिवसाला तिकीट दरातून मिळणारा अडीच कोटी रुपयांचा आकडा साडेतीन कोटींपर्यंत पोहोचला. मु ंबई महापालिकेने बेस्टला विश्वासात न घेता, तीन वर्षांपूर्वी किमान भाडे पाच रुपये करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा फटका बेस्ट प्रशासनाला पडला होता. मु ंबई महापालिकेने ज्या पद्धतीने मदत करण्याचे आश्वासन दिले होते, तेवढी रक्कम बेस्टच्या पदरात पडत नसल्याने, दिवसेंदिवस बेस्टच्या तोट्यातील आकडा वाढत गेला होता. एकेकाळी हाच विद्युत पुरवठा विभाग बेस्टच्या परिवहन उपक्रमाला पूरक ठरून तग देऊन राहिला होता, म्हणून आज इतकी वर्षे बेस्टचा वाहतूक विभाग हा अखंडपणे सुरू राहिला. मात्र आता सर्व बाजूंनी आर्थिक कोंडी झाल्याने बेस्टच्या परिवहन विभागाला उतरती कळा लागली. बेस्ट प्रशासन हे मु ंबई महापालिकेत विलीनीकरण करावे, ही मागणीही सातत्याने कर्मचारी संघटनांकडून केली गेली. बेस्ट प्रशासनाने भाडेवाढीच्या निर्णयामुळे काहीसा बेस्टला दिलासा मिळाला असला तरी, तोट्यातून मार्ग कसा काढायचा हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

# अजितघडीचा काळ बदलला
## शेतकऱ्याचा पोरगा बनला राज्य प्रवक्ता

लेखक – नदीम शेख (बीड ९३७०४५७७२७)

सत्तेच्या सदरात अजित पवार हे प्रदेशाचे चेहरा बनून उभे राहिले, तेवढेच नव्हे तर त्यांच्या राजकारणाच्या विचारसरणीलाही वेगळेपणाची छाप मिळाली. बीडच्या ग्रामीण भागाशी जोडलेला आणि शेतकऱ्याचा मुलगा प्रदेशाचा प्रवक्ता बनला आहे. राजकारणाच्या तत्त्वांचा विचार करता, गरीब आणि बिगर-राजकीय घराण्यातील व्यक्तीला प्रदेशाच्या राजकारणात उतरविण्याची ही पहिलीच वेळ आहे. अजित पवार यांच्या या नव्या विचारांचे कौतुक सर्वत्र होत आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रातील नामांकित चेहरा भागवत तावरे यांना प्रदेश प्रवक्ता बनवून राष्ट्रवादीने चांगलाच धक्का दिला आहे. हिंदू-मुस्लिमांच्या गंगा-जमुना तहजीबवर लेखन करणारा, बोलणारा हा चेहरा जेव्हा अजित पवारांच्या पक्षाची बाजू मांडेल, तेव्हा जगाला कळेल की अजित पवारांनी कसा हिरा घडवला आहे. बीड जिल्ह्यातील नाळवंडी गावातील एक तरुण पत्रकारितेच्या जगात पाऊल टाकतो. बेधडक लेखन, निःसंकोच भाषणे, गरीबांच्या वेदना मांडणारी त्याची लेखणी आणि गरजूंना मदत करण्याची त्याची वृत्ती – यामुळे तो सर्वांचा लाडका होतो. त्याचे चाहते, वाचक संपूर्ण प्रदेशभर वाढू लागतात. मुस्लिम तरुणांमध्येही भागवत तावरे लोकप्रिय होतात. लोक त्यांना “लोकपत्रकार” म्हणून ओळखू लागतात. सेक्युलर विचारसरणीचा चेहरा म्हणून भागवत तावरे महाराष्ट्रभर ऐकले जाऊ लागतात, विशेषतः जेव्हा शाहीन बाग आंदोलन सुरू होते. तासन्तास चालणाऱ्या उर्दू आणि हिंदी भाषणांनी त्यांची प्रतिमा अधिक ठळक झाली. आज ते अजित पवारांच्या पक्षाचे प्रदेश प्रवक्ता आहेत. कास्तकार हरिहर तावरे यांचा मुलगा राज्याच्या



राजकारणात उद्याचा घडवलेला नेता म्हणून पुढे येईल, यात शंका नाही. लहानपणापासून हिंदू-मुस्लिमांसोबत राहणारे तावरे नेहमी एकोपा आणि मेलमिलापाची बाजू मांडतात. त्यांनी नेहमीच धर्मवाद, जातीयवादाचा निषेध केला आहे. सत्य बोलण्याचे धाडस त्यांनी अनेकदा दाखवले आहे. दहा वर्षांच्या पत्रकारितेचा प्रवास अखेर योग्य ठिकाणी पोहोचला आहे. भागवत तावरे हे मुस्लिम, हिंदू, दलितांच्या सभांमध्ये जाऊन सत्य मांडणारे व्यक्तिमत्व आहे. राजकारणातील बारकावे समजणारे तावरे राष्ट्रवादीच्या निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावू शकतात.उर्दू-हिंदीचा उत्तम कलाकार भागवत तावरे जेव्हा हिंदी भाषणाला सुरुवात करतात, तेव्हा ऐकणारे भारावून जातात. पूर्ण आदर आणि शिष्टाचाराने सलाम करून ते बोलायला सुरुवात करतात आणि प्रेक्षक मंत्रमुग्ध होतात. शाहीन बाग आंदोलनात त्यांनी तासन्तास हिंदीत भाषण केले, तेव्हा श्रोते वेळेचं भान विसरून ऐकत राहिले. राष्ट्रवादीकडून तावरे हिंदीत पक्षाची बाजू मांडणारा हिंदू-मराठा चेहरा ठरतील. वारकरी संप्रदायातील प्रवचनकार आणि हिंदीवरील प्रभुत्व असलेला असा चेहरा प्रदेशाच्या राजकारणात पहिल्यांदाच मिळणार आहे. धनंजय मुंडे झाले जोहरी हिऱ्याची पारख आवश्यक असते. मराठा समाजातून आलेल्या तावरेंना बीडहून मुंबईपर्यंत घेऊन गेले ते धनंजय मुंडे. मुंडे यांच्या व्यापक राजकीय मोहिमेचे दर्शन घडवणारा हा निर्णय मराठा समाजात आनंदाची लाट निर्माण करणारा ठरला. भागवत तावरे यांच्यासाठी प्रयत्न करून पक्षात स्थान मिळवून देणारे धनंजय मुंडेच होते. ग्रामीण आणि गरीब पार्श्वभूमी असलेल्या चेहऱ्याला प्रवक्त्याचे पद मिळवून देण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला. यात तावरेना पक्ष मिळाला आणि पक्षाला तावरे. भागवत तावरे हे आता केवळ एक व्यक्तीचे नाव राहिलेले नाही, तर समाजसेवा, संघर्ष आणि जनतेच्या आवाजाचे प्रतीक झाले आहेत. गावाच्या गल्लीपासून राज्याच्या मंचापर्यंतचा त्यांचा प्रवास सोपा नव्हता. ही कथा आहे अशा व्यक्तीची, ज्याने पद आणि प्रतिष्ठेचे स्वप्न पाहून नव्हे, तर लोकांच्या वेदना कमी करण्याच्या हेतूने आपली वाटचाल सुरू केली. समाजात राहून त्यांनी गरीब, वंचित आणि दबलेल्यांचा आवाज बुलंद केला. त्यांनी हे सिद्ध केले की नेतृत्व फक्त खुर्चीवर बसण्यात नाही, तर जनतेत राहून त्यांच्या समस्या समजून घेण्यात आणि त्यांचे निराकरण करण्यात आहे.राज्याचा प्रवक्ता बनणे हे त्यांच्यासाठी नक्कीच सन्मानाची बाब आहे, पण ते याला आपले अंतिम ध्येय मानत नाहीत. उलट, हे त्यांच्यासाठी एक नवे साधन आहे – ज्याद्वारे ते आणखी जास्त लोकांचा आवाज सरकार आणि समाजापर्यंत पोहोचवू शकतील. त्यांचा हा प्रवास आपल्यासाठी प्रेरणादायी आहे की जर नीयत स्वच्छ असेल आणि मेहनत खरी असेल, तर मंजिले स्वतःहून आपल्यापर्यंत येतात.भागवत तावरे यांचा हा प्रवास दाखवतो की समाजसेवा ही केवळ एक नोकरी नाही, तर ती एक जीवनशैली आहे. आणि जेव्हा आयुष्य समाजासाठी समर्पित असते, तेव्हा यश आणि सन्मान आपोआप आपल्या पायाशी येतात.

# लढा अजून संपलेला नाही... तो आता अधिक प्रखर झालेला आहे - सिद्धार्थ

प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे (उरण) उरण दि १० उरण तालुक्यातील शेवा कोळीवाडा येथील जेएनपीटी प्रकल्पबाधित मच्छिमार बांधवांवर गेली ४० वर्षे अन्याय चालू आहे. त्यांच्या गावाचे विस्थापन करून कायदेशीर पुनर्वसन न करता, अनेक वर्षे या कोळी बांधव आणि भगिनींना संक्रमण शिबिरात (Transit Camp) ठेवण्यात आले.अखंड संघर्ष, अंगावर खटले घेऊन, पुनर्वसनाच्या हक्कासाठी लढा देत अखेर १०.४६ हेक्टर जागेस दि.१७/११/२०२१ रोजी मंजुरी मिळाली. या मंजुरीस केंद्र सरकारची मान्यता मिळूनही जेएनपीटी प्रशासन , रायगड जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकार शेतकरी व बिगर शेतकरी २५६ भूखंड नकाशा व भुखंड यादीला मंजूरी असताना सुध्दा वाटपास टाळाटाळ करीत आहेत.या अन्यायाविरोधात आणि रक्षाबंधन या विश्वासाचे सनाचे पवित्र दिवशी कोळी बांधवांनी मंजूर नकाशा नुसार सिंबॉलिक ताबा व भूखंड वाटपाचा कार्यक्रम सुरु केला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कुदळ मारून व नारळ फोडून करण्यात आले. उदघाटन सोहळा सिध्दार्थ इंगळे,नंदकुमार पवार, रमेश कोळी व त्यांची पत्नी उज्वला कोळी यांच्या हस्ते झाला. आणि सर्व वरिष्ठ महिला व पुरुष यांनी श्री गणेश पुजा केली.या प्रसंगी वकील सिद्धार्थ इंगले,नंदकुमार पवार, कोळी बांधवाचे सर्वेसर्वा रमेश कोळी, सुरेश कोळी,परमानंद कोळी, मंगेश कोळी, ॲड. विकास शिंदे तसेच सर्व समस्त कोळी बांधव व भगिनी उपस्थित होते.माझ्यावर हा मान सोपवल्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. माझी सामाजिक जबाबदारी आणि नैतिक कर्तव्य समजून, मी आपल्यासाठी सदैव कर्तव्यदक्ष राहीन. लढा अजून संपलेला नाही तो आता अधिक प्रखर झालेला आहे असे परखड मत मुंबई उच्च न्यायालयाचे वकील सिद्धार्थ इंगळे यांनी व्यक्त केले.गेली ४० वर्षे उलटूनही पुनर्वसन न झाल्याने शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) ग्रामस्थ आक्रमक झाल्याने सिंबॉलिक ताबा व भूखंड वाटपचा कार्यक्रम संपन्न झाल्याने प्रशासनाला ही एक चपराक आहे.या कृतीतून प्रशासनाला थेट इशारा देण्यात आला आहे. या कृतीतुन ग्रामस्थांनी केंद्र, राज्य शासनाचा निषेध केला आहे.



# गोरगरिबांच्या अतिक्रमणावर हातोडा पण भूमाफियांना पायघड्या , शासकीय कर
## थकविणा-यांना मोकळीक - नगरपरिषद प्रशासनाचा अजब कारभार :- डॉ.गणेश ढवळे

- - -

बीड :- ( दि.१० ) काल दि.०९ शनिवार रोजी नगरपालिका प्रशासनाने बीडमधील वाहतुकीचा अडथळा दूर करण्यासाठी ३ तासात ५० गोरगरिबांच्या अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय दिला.उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर आले की नगरपालिकेकडुन शहरातील गोरगरिबांच्या चहाचे हातगाडे, टपरीधारक,छोटे मोठे दुकानदार, फळ विक्रेते,हातावर पोट भरणारे यांचे वाहतुकीस अडथळा ठरणारे अनाधिकृत अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय देणारी नगरपालिका बीड शहरातील राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हडपण्यात आल्या असुन त्यावर कधी कारवाई करणार तसेच नगरपालिका हद्दीतील ३२ शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल पावणे ३ कोटी रूपयांचा सरकारी कर थकला असुन कधी वसुल करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन जिल्हा प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

उद्यान,मंदिरांसाठी राखीव (ओपन स्पेस) असलेल्या शहरातील खुल्या जागा हडपणा-यांवर कारवाई कधी??

- -

प्लॉटिंग व बांधकाम करताना उद्यान , मंदिरासाठी राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने भुमाफियांनी गिळंकृत केल्या आहेत. विशेष म्हणजे नगरपालिका, नगररचनाकार, भूमी अभिलेख या तिन्ही कार्यालयातील व्यक्तींच्या मदतीने भूमाफिया आणि नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांनी संगनमताने या जागा स्वतःच्या नावावर करून घेतल्या आहेत. बनावट पीटीआर, पीआर कार्ड देखील तयार



करण्यात आले आहेत. या प्रकरणी कधी कारवाई करणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक कार्यालयासह ३२ शासकीय कार्यालयांकडे थकलेला कर नगरपालिका कधी वसुल करणार?? - डॉ.गणेश ढवळे

- - -

बीड नगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी , पोलिस अधीक्षक, महावितरण, जिल्हा न्यायालय, बीएसएनएल , शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल २ कोटी ८७ लाख रुपयांचा कर थकला आहे यात पोलीस अधीक्षक जिल्हाधिकारी कार्यालय अशा प्रमुख कार्यालयांचा समावेश आहे यांच्याकडील थकीत कर नगरपालिका कधी वसुल करणार की केवळ गोरगरीब जनतेवर कारवाई करण्यातच मर्दुमकी गाजवणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ११ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा दादरमध्ये उत्साहात पार पडला

## कुमार शौर्य शाह व कुमार कनिष्क जैन यांचा प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन गौरव




/ प्रतिनिधी – प्रांजली काळबेंडे मुंबई, दि. ७ ऑगस्ट २०२४ – टाईम्स ऑफ इंडिया तर्फे २०२४–२५ शैक्षणिक वर्षात इयत्ता ९ वीमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा भव्य सन्मान सोहळा आज दादर येथील रविंद्र नाट्य मंदिरात पार पडला. या सोहळ्यात विविध शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये सेंट झेवियर्स बॉईज अकॅडमीचे कुमार शौर्य शाह आणि कुमार कनिष्क जैन यांनी विशेष लक्ष वेधून घेतले. दोघांनाही प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. समारंभादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले. दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे व शाळेचे नाव गौरवाने उंचावल्यानं सर्वत्र कौतुकाचा वर्षाव झाला. उपस्थितांनी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या., राजेंद्र प्रभाकर तांगडे, अण्णासाहेब श्रीराम तांगडे, महेश प्रभाकर तांगडे, विलास माधवराव तांगडे, एकनाथ नामदेव तांगडे, प्रकाश अण्णा हरिभाऊ तांगडे, भास्कर गणपतराव तांगडे, नारायण दादा नामदेव तांगडे, महेश प्रभाकर जोशी, रमेश राव शेषेराव भुतेकर, रामेश्वर आबासाहेब तांगडे, विष्णू रामभाऊ तांगडे, संभाजी निळोबा तांगडे, सुरेश मदनराव तर, सुदर्शन आप्पासाहेब तांगडे यांचा प्रामुख्याने समावेश आहे प्रति पौर्णिमेला या कमिटीतील दोघा जणांनी या कार्यक्रमाचा भार उचलायचा आहे असे या कमिटीच्या अंतर्गत ठरले आहे

# बीडमध्ये झाली राज्यस्तरीय मुस्लिम पत्रकार फाउंडेशनची स्थापना

## धर्मदाय उपायुक्त प्र.म.चौधरी साहेब यांनी दिले संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र

### राज्याध्यक्ष म्हणून मोहंमद अबूबकर, राज्यउपाध्यक्ष शेख तालिब अन् राज्य सचिव शेख समीर

बीड, ÷ बीड जिल्ह्यातील मुस्लिम पत्रकारांनी एक क्रांतीकारी निर्णय करत बीडच्या धर्मदाय उपायुक्त कार्यालयातून मुस्लिम पत्रकार फाउंडेशनची स्थापना केली. नोंदणी क्र0000524/2025 प्रमाणे काल दि.5 ऑगस्ट रोजी नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. धर्मदाय उपायुक्त प्र.म.चौधरी यांच्या आदेशानुसार संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र काल देण्यात आले. या पत्रकार संघामध्ये संस्थापक राज्याध्यक्ष म्हणुन मोहंमद अबुबकर तर राज्यउपाध्यक्ष म्हणुन शेख तालिब तर राज्य सचिव म्हणुन शेख समिर, सहसचिन म्हणुन सय्यद अखिल, कोषाध्यक्ष म्हणुन शेख जावेद आणि सदस्य म्हणुन शेख शाकेर,



साजन चौधरी, मोहंमद काशेफ, सय्यद नदीम हे असणार आहेत. काल बीडच्या धर्मदाय कार्यालयात कार्यालयीन अधिक्षकांसह धर्मदाय जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यालयीन अधिक्ष के.पी तुपेकर, वरिष्ठ लिपीक सुग्रीव सपकाळ, कनिष्ठ लिपीक द.वि. लांगडे बीड जिल्हा धर्मदाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. उदयसिंह सालपे पाटील,ॲड.श्रीमती प्रिती हुंबे मॅडम, ॲड.सुनंदा जाधव मॅडम, ॲड.ईश्वर गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राज्याध्यक्ष मोहंमद अबुबकर यांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी विशेष उपस्थिती म्हणुन बीड जिल्हा कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल यांची उपस्थिती होती. या संघटनेच्या वतीने आता भविष्यात मोठ्या प्रमाणात पत्रकारांविषयी काम करण्यात येणार आहे. त्यामध्ये मुस्लिम पत्रकारसह सर्व जाती धर्मातील पत्रकार यांच्या गोर गरीब, होतकरू मुला मुलींसाठी बालवाडी, अंगणवाडी, अनाथ आश्रम इ.चालविले जाणार आहे. मुस्लिम पत्रकार व इतर समाजातील पत्रकारांच्या मुला मुलींचे जिवनमान उंचविण्याकरीता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय स्थापन केले जाणार आहे तसेच अंध व अपंग यांच्यासाठी विशेष काम केले जाणार आहे. पत्रकारांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार याच्या विरूध्द ही संघटना काम करणार आहे. पत्रकारांच्या प्रत्येक समस्या सोडविण्यासाठी या फाउंडेशन मार्फत काम केले जाणार आहे. लवकरच राज्यभराचा दौरा करून संपूर्ण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्षांची नियुक्ती केली जाणार आहे. सदस्य नोंदणीला सुरूवात झाली असून बीडमध्ये काही दिवसात एक मोठे पत्रकारांचा कार्यक्रम घेवून त्यामध्ये सदस्य नोंदणीला सुरूवात केली जाणार आहे. या नवीन सुरूवातीला आपले सहकार्य मिळेल हीच अपेक्षा....

# माजलगाव बसस्थानकाची पाडापाडी रोखण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्षांना निवेदन.

माजलगाव दी 10 प्रतिनिधी मराठवाड्यात उत्कृष्ट असलेले माजलगाव बस स्थानक पाडण्याचा कुटील डाव गुत्तेदारांना हाताशी धरून आखण्यात आला आहे. दरम्यान माजलगाव बस स्थानकाची पाडापाडी रोखण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्षांना निवेदन देण्यात आले.

माजलगाव येथे राज्य परिवहन महामंडळाचे टोलेजंग बस स्थानक आहे. 1990 च्या दशकात सदरील बस स्थानकाची उभारणी झाली आजही हे बस स्थानक सुस्थितीमध्ये उभे असल्याचे दिसते. आहे त्या बस स्थानकाची डागडूजी करून ही इमारत अजून 40 वर्ष तरी भक्कम अवस्थेत उभी राहू शकत असताना चांगल्या स्थितीतील बस स्थानक पाडून पत्राचे शेड उभारण्याचा कुटील डाव आखण्यात आला आहे.गुत्तेदराचे पोट भरण्यासाठी काही लोकप्रतिनिधी टक्केवारीच्या आशेने बस स्थानक जमीनदोस्त करीत आहेत. या बस स्थानकाशी माजलगाव वासियांचा भावनिक ऋणानुबंध आहे बस स्थानकाची इमारत जुनी झाली असल्यास ती पाडण्यास हरकत नाही परंतु चांगल्या स्थितीमधील बस स्थानक पाडून त्या ठिकाणी पत्र्याचे व फायबरचे शेड उभारण्याचे कारण काय?दरम्यान या बसस्थानक इमारतीला नवीन बस स्थानक हा पर्याय ठरू शकत नाही नवीन बस स्थानक हे पत्र्याचे व फायबरचे असणार आहे तसेच कमी जागेत बस स्थानक उभारण्यात येणार आहे. हे बस स्थानक



चाळीस वर्षे ही टिकणार नाही असे असतानाही जुने भक्कम सुस्थितीतील बस स्थानक का पाडण्यात येत आहे? हे कोडे उलगडणे अनाकलनीय आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनतेच्या भावना लक्षात घेऊन पाडण्यात येणाऱ्या बसस्थानक प्रक्रियेला स्टे द्यावा अशी जनतेची आशा आहे. माजलगाव भाजप अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्याकडे दिलेल्या निवेदनात माजलगाव बस स्थानकाचे नूतनीकरण करण्यात यावे. नवीन बस स्थानक हे पत्राचे व फायबरचे असल्याने त्याला माजलगाव वासियांचा विरोध आहे अशा आशयाचे निवेदन दिले आहे या निवेदनावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांनी सरकारकडे योग्य बाजू मांडणार असल्याची प्रतिक्रिया दिली दरम्यान याप्रसंगी भाजप अध्यक्षांसोबत सरचिटणीस पवन मोगरेकर सोशल मीडिया राज्य सदस्य दत्ता महाजन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सोमेश दहिवाळ यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# श्रीक्षेत्र श्रीरामगड माळापुरी फाटा येथे पंचकुंडिय गायत्रीयज्ञ संपन्न



बीड प्रतिनिधी येथून जवळच असलेल्या माळापुरी फाटा येथील श्रीराम संस्थांवर अ.वि. गायत्री परिवार हरिद्वार शाखा बीड यांच्या वतीने व गायत्री परिवाराचे जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महार–ाज खरमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली प.पु.गुरुदेव यांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार अ.वि.गायत्री परिवार बीड शाखेच्या वतीने काल दिनांक ३/८/२५ रविवारी गायत्री पंचकुंडी यज्ञ संपन्न झाला . या वेळी सकाळी मंदिर परिसरामध्ये हरिनामाच्या गजरात व पावले खेळत डोक्या–वर कलश घेऊन दिंडी मिरवणूक काढण्यात आली होती .मिरवण–ुकीनंतर पंचकुंडी यज्ञाला सुरुव–ात झाली. भरपूर पाऊस पडावा, शेतकरी राजा आनंदी व्हावा,धन–धान्य व सुख–समृद्धी यावी तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटावा यासाठी वरूण राजाला विनंती करून त्यांच्या नावे पर्जन्यवृष्टी साठी आहुती टाकण्यात आल्या. यावेळी माळापुरी, बीड ,पेडगाव, आदि परिसरातील भावीकभक्त माता भगिनी, बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते .बीड चे व्यापारी बंधु ही मोठ्या संख्येने हजर होते. या यज्ञाचे पौरोहित्य मोहन महाराज खरमाटे यांनी केले . यज्ञाचे मुख्य यजमान श्रीराम गड संस्थांचे ह.भ.प.गोकुळ शास्त्री तुपे व सहपरिवार हे होते.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या प्रयत्नांना यश; मेळघाटातील ५० गावांना अखेर सुरळीत वीज पुरवठा

अमरावती प्रतिनिधी : महावितरणच्या ३३ केव्ही जारीदा (चिखलदरा) उपकेंद्राला वन विभागाची अंतिम मंजुरी मिळाल्याने जारीदा व परिसरातील ५० गावांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठ्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गेली चार वर्षे प्रलंबित असलेला हा महत्त्वाचा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या विशेष प्रयत्नांमुळे आणि जिल्हा प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर झाला. मेळघाटातील अतिदुर्गम, आदिवासीबहुल भागातील विजेच्या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी जिल्हा विकास निधीतील आदिवासी उपयोजनेंतर्गत ९ कोटी ३३ लाख ९४ हजार रुपये खर्च करून जारीदा येथे नवीन ५ एमव्हीए क्षमतेचे ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात आले आहे. या उपकेंद्राला ३३ केव्ही वाहिनीव्दारे २२० केव्ही कोयलारी (मध्य प्रदेश) उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जाणार आहे. उपकेंद्राचे काम ऑक्टोबर २०२३ मध्ये पूर्ण झाले होते, मात्र वन्य जीव संरक्षण कायदा आणि वन संरक्षण कायद्यांतर्गत क्षेत्र असल्याने मंजुरीचा अडथळा निर्माण झाला होता. या मंजुरीसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची स्थायी समिती, पर्यावरण मंत्रालयाची सल्लागार समिती तसेच वन



विभागाच्या मान्यतेची प्रक्रिया पार पडली. अखेर ६ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यावरण मंत्रालयाकडून अंतिम मंजुरी मिळाली.या निर्णयामुळे जारीदा उपकेंद्र कार्यान्वित होणार असून ५० गावांमधील नागरिकांना अखंडित वीज पुरवठा मिळणार आहे. स्थानिकांनी सरन्यायाधीश भूषण गवई आणि प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# केज तालुक्यातील विडा जि.प.सर्कल निवडणूक लढवण्याचे पडु लागले भुरट्या पुढाऱ्यांना स्वप्न

केज । प्रतिनिधी केज तालुक्यातील वीडा जिल्हा परिषद गट हा पूर्वी पासुन केज तालुक्यातील चर्चेत आसलेला गट आहे परंतु अनेक परिसरात पुढारी झाल्या मुळे भुरटे पुढारी वीडा गटातुन निवडणूक लढवण्याचे आनेक स्वप्न पडु रंगवत आहेत ही अतिशय लाजिरवाणी बाब आहे, कारण भुरटा पुढारी जिल्हा निवडणूक जवळ आली की तोंड वरी करून निवडून लढवण्याचे स्वप्न पहातो व फॉम भरण्याच्या वेळेस कुनाकडुन तरी स्वताच्या पोटाच्या खळगी भरतो आणि गप्प बसून राहतो असे काम भुरट्या पुढाऱ्यांचे आहे. ज्या भुरट्या पुढाऱ्यांनी विडा सर्कल गावातील विकास कामांना अडथळा निर्माण केला तसेच



यांची लावालावी कर त्यांची लावालावी कर अशा स्वयम घोषित पुढाऱ्यांला विडा जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याचे स्वप्न पडु लागले आहेत व विकासाच्या नावाने बोंबाबोंब असा भुरटा विकास होऊ लागला तर आडवा आडवी करणे असे निच दर्जाचे काम करणाऱ्या वीडा सर्कल मधील जनता स्वीकारले का? असा प्रश्न उपस्थित केला आहे, अशी चर्चा नागरिकांन मध्ये सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने अनेक भुरटे पुढारी वीडा जिल्हा परिषद लढवण्याचे स्वप्न पहात आहेत, परंतु आजपर्यंतचा इतिहास पहाता आपण लोकांना कितपत कामाला पढलो हे नक्कीच सर्कल मधील मतदारराजा आता जागृत असुन भुरट्या पुढार्याच्या थापला भुलनार नाही आशी चर्चा जोर धरताना दिसत आहे.

# बालेपीर भागात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला

## शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेसाठी बंदोबस्त करण्याची इम्रान शिकलगर यांची नगर परिषदेला मागणी



अहमदनगर रोडवरील बालेपीर वॉर्ड क्रमांक ११ व १२ मध्ये मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सकाळी शाळेत जाणाऱ्या लहान मुलांवर कुत्र्यांच्या टोळक्यांकडून हल्ल्याचा धोका निर्माण झाला असून, परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. या पार्श्वभूमीवर इम्रान शिकलगर यांनी नगर परिषद बीड प्रशासनाकडे मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. मुलांना सुरक्षितपणे शाळेत जाता यावं, यासाठी कुत्र्यांची धरपकड आणि योग्य कारवाई आवश्यक आहे, असं ते म्हणाले. शहरातील इतर भागात देखील मोकाट कुत्र्यांचा त्रास जाणवत असतानाही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांत भावना आहे. बालेपीर वॉर्डात कुत्र्यांचा बंदोबस्त न झाल्यास, नागरिकांच्या सुरक्षिततेवर मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार ११ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# महाराष्ट्र हादरला! आधी अंगात भूत असल्याची भीती दाखवली, नंतर अल्पवयीन मुलीला लॉजवर नेलं

मुंबईजवळील विरारमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. अंगात 4 भूत असल्याची भीती दाखवून 17 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. तसेच त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. पीडित मुलीच्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील पीडित मुलगी मित्रासोबत जीवदानी मंदिरात गेली होती. त्यावेळी तिच्या अंगात आलं. तिच्या अंगात भूत आहे असं सांगण्यात आलं. त्यानंतर तिच्या मित्राने तिला एका भोंदू बाबाकडे नेलं. यावेळी भोंदूबाबाने तिला पाहिलं आणि अंगातलं भूत उतरवण्यासाठी एक विधी करण्याची गरज आहे असं म्हटलं. भोंदूबाबाने पीडितेला, ‘तुझ्या अंगात 4 भूतं आहेत, तुझ्या भविष्यासाठी ते चांगले नाही, तुला बाळ होणार नाही आणि तुझा नवरा ही जिवंत राहणार



नाही अशी भीती दाखवली आणि विधीसाठी त्या अल्पवयीन तरुणीला नालासोपारा येथील राजोडी बिच वरील एका हॉटेल्स मध्ये नेऊन दोघांनी सामूहिक अत्याचार केला. प्रेम पाटील आणि करण पाटील अशी आरोपींची नावे आहेत.आपल्यावर अत्याचार झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने पोलिसात तक्रार दिली. यानंतर पीडित तरुणीच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम 37 (2), 64, 64 (2), (1) 41 सह पोस्को कायदा कलम 4, 8, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंधित घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्यटन करण्याबाबत अधिनियम 2013 चे कलम 3 प्रमाणे विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेच्या काही तासांनंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. या दोन्ही आरोपींना वसई न्यायालयाने 12 ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आता पोलिस पथक या घटनेचा कसून तपास करत आहे. तसेच या आरोपींनी इतरही मुलींसोबत असं कृत्य तर केले नाही ना? याचाही शोध घेतला जात आहे. आता परिसरातील नागरिकांनी या आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथीला उसळला जनसागर

बीड । प्रतिनिधी गोरक्षनाथ टेकडीला या परिसरात वेगळे महत्त्व असून नातपंथीयांचे कार्य समाज उपयोगी आहे त्यामुळे या टेकडीला मानणारा वर्ग मोठा असून जोपर्यंत सूर्य चंद्र तारे आहेत तोपर्यंत नाथांची कीर्ती आजर अमर राहील असे गौरव उद्गार पाचपोर महाराज यांनी काढले. दरम्यान शनिवारी गोरक्षनाथ टेकडी येथे किसान बाबा यांची पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली असून या सांगता समारंभात लाखोंचा जनसागर उसळला होता. विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य किसन बाबा महाराज यांची




२७ वी पुण्यतिथी निमित्त आज पहाटे गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या समाधीची विधिवत गुरू पूजन महंत गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते करण्यात आली. सकाळी १२ वाजता प्रतिवर्षी प्रमाणे विदर्भरत्न रामायणाचार्य ह.भ.प.संजयजी महाराज पाचपोर बुलढाणा यांचे काल्याच्या कीर्तनाने झाली. या कीर्तनसाथ नानाभाऊ लांडे महाराज, व लक्ष्मीकांत म कदम मृदंगसाथ धनंजय महाराज बोंगाने , अनिकेत महाराज लांडे यांची कीर्तनात मृदुंग साथ दिली. अभंग विवेचन करताना पाचपोर महाराज यांनी सांगितले की नाथांनी आपल आयुष्य गोर गरिबांच्या हितासाठी अर्पण केले. गोर गरिबांच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत म्हणून नाथांनी आयुष्य घातले आदिनाथ, मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथ, साधू महाराज, गुरुवर्य किसनबाबा महाराज, शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी आपल आयुष्य जनसामान्य माणसासाठी घातले. म्हणून जो पर्यंत या पृथ्वीवर चंद्र सूर्य आहे तो पर्यंत नाथांची किर्ती अजरामर होत हा नाथाचा लोककल्याणाचा वारसा गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज हे चालवत आहेत असे प्रतिपादन पाचपोर महाराज यांनी केले. टाळकरी, वारकरी, यांच्या राजकीय बीड जिल्ह्यातील माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, खा. बजरंग सोनवणे सह भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी मध्ये गुरुवर्य किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी निम्मित अखंड हरिनाम सप्ताह व पुण्यतिथी कार्यक्रमाची सांगता झाली

## हारुणभाई इनामदार व सीताताई बनसोड आणि महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी मानले आभार

केज शहरातील बीड रोडवरील अनिल भोजनालयाच्या समोर लाईटची नवीन डीपी बसवल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड आणि महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी आभार व्यक्त केले आहे. केज शहरात सतत लाईटचा तुटवडा भासत असून नागरिकांना लाईट साठी अनेक गोष्टीचा सामना करावा लागत आहे व अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. केज शहराची वाढती लोकसंख्या व व्याप्ती पाहून महावितरण कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयाने केज शहरांमध्ये काही नवीन डीपी दिल्या आहेत. परंतु डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे महावितरण कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांना अडचण निर्माण होत आहे. काही नागरिकांनी ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या समवेत संपर्क करून नवीन डीपी बसवण्यासाठी जागेचा प्रश्न मांडला व नवीन डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी केली असता, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी तात्काळ जागेचा प्रश्न मार्गी लावून केज शहरातील अनिल भोजनालयाच्या समोर नवीन डीपी बसवण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली व त्या ठिकाणी नवीन डीपी बसवण्यात आली आहे. त्याकरिता सीताताई बनसोड,हारुणभाई इनामदार व महावितरण कार्यालयाचे नागरिकांनी आभार व्यक्त केल

## दि. वैद्यनाथ अर्बन को- ऑप. बँक लि. संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक-२०२५




आज केज शहर येथील मतदान केंद्रावर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मतदानाचा हक्क बजावला.

## केतुरा बेलुरा परिसरामध्ये खाजा बाबा डोंगर या ठिकाणी दिसला बिबट्या, परिसरातील ग्रामस्थांनी सतर्क रहावे ,अनिकेत घारगे

### वन विभाग सतर्क, ग्रामस्थांनी केले आपल्या मोबाईल मध्ये बिबट्याच दृश्य कैद,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी बीड तालुक्यातील केतुरा बेलुरा परिसरामध्ये खाजा बाबा डोंगर या ठिकाणी आज बिबट्या आढळल्याचे दिसून आले, सदरील परिसरातील ग्रामस्थ आपल्या शेतामध्ये काम करत असताना एक जणाला अचानक डोंगराच्या शेजारी असलेल्या शेतामध्ये तो शेतकरी काम करत असताना त्याला अचानक बिबट्या दिसला त्यांनी सदरील आपला मोबाईल काढला आणि सदर बिबट्याचे दृष्य आपल्या मोबाईल मध्ये कैद केलं व सदर व्हिडिओ प्रचंड प्रमाणात





व्हायरल झाला आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली, सध्या वन विभागाचे अधिकारी गावी त्या परिसरामध्ये तळ ठोकून आहेत व ग्रामस्थांना भिऊ नका व आपापले जनावरे लहान मुले व्यवस्थित सुरक्षित ठेवा असे आव्हान वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले, यावेळी केतुरा बेलुरा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अनिकेत घारगे यांनी परिसरातील ग्रामस्थांना ग्रामस्थांना भिऊ नका सतर्क रहा सुरक्षित रहा काम असेल तरच घराबाहेर पडा असे आव्हान अनिकेत घारगे यांनी केले

# भक्ती मार्गावर जाण्यासाठी जात धर्म लागत नाही-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी जिल्ह्यात ज्या-ज्या ठिकाणी गड आणि संस्थान आहेत अशा ठिकाणी लाखो लोकांचा जनसमुदाय वारकरी सांप्रदायाच्या भक्तिमार्गावर दिसतो आहे. त्यामुळे भक्ती मार्गावर जाण्यासाठी जात धर्म लागत नाही हेच यावरून लक्षात येते. गोरक्षनाथ टेकडीचा विकास होत असताना यासाठी भरीव निधीची गरज आहे बीड जिल्ह्यातील प्रत्येक गडाचा आणि संस्थानचा विकास व्हायलाच हवा असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. वै.किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणानिमित्त ढेकणमोहा जवळील श्रीक्षेत्र संस्थान गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, खा.बजरंग सोनवणे, युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, प्रा. जगदीश काळे, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, सुभाष क्षीरसागर, सखाराम मस्के, अरुण बोंगाणे, ह.भ.प. हरिदास जोगदंड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मठाधिपती नवनाथ बाबा यांचे आशीर्वाद घेतले याप्रसंगी संबोधित करताना ते म्हणाले की, पाऊस असतानाही लाखो भाविकांची गर्दी गोरक्षनाथ टेकडीवर





आहे यावरूनच टेकडीचे महत्त्व दिसू लागले आहे. या टेकडीवर गोरक्षनाथाच्या सहवासाने पवित्र झालेल्या या परिसराचा विकास होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सत्तेवर असताना आपण ज्या-ज्या सुख सुविधा आवश्यक होत्या त्या आपण आग्रहाने उपलब्ध करून दिल्या आहेत. सत्ता असो अथवा नसो देवस्थान विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत असतो सध्याचे लोकप्रतिनिधींनी यासाठी पुढाकार घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक गडाचा आणि संस्थानचा विकास करायला हवा, ही आपली ठेव आहे याचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वारकरी संप्रदायाने दिलेला मूळ मंत्र प्रत्येकाच्या मनात आहे आज रक्षाबंधन असतानाही महिलांनी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थिती दाखवली, भक्तिमार्गावर जाण्यासाठी जात-धर्म लागत नाही आपण आयुष्यात काय कमावतो हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं असे सांगून आलेल्या सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विष्णू महाराज लांडे, गोरख दन्ने, यादव सुरवसे, हनुमान देवकते, रामा भोगे, बालाप्रसाद जाजू, ओमप्रसाद खवतड, संदीप डावकर, नारायण माने, बंडू गाडीवान, नवनाथ घोडके, विक्रम करांडे, बंडूपंत लांडे, विष्णूपंत काळे, नागेश शिंदे, राजेंद्र पवार, नारायण देवकते, महादेव थापडे, बाजीराव पवार, देवराव घोडके, सोमनाथ माने यांच्या सह भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com